सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधी व न्याय विभाग

# सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ८

## बृहन्मुंबईचे कायदे व मुंबई उच्च न्यायालय (हद्दी जाहीर करणे) (सुधारणा) अधिनियम, १९५०

(दिनांक ५ नोव्हेंबर १९८५ पर्यंत सुधारित)

# BOMBAY ACT No. VIII OF 1950

## THE GREATER BOMBAY LAW AND THE BOMBAY HIGH COURT (DECLARATION OF LIMITS) (AMENDMENT) ACT, 1950

(*As modified upto 5th November 1985*)

[ किंमत—२० पैसे ]

# बृहन्मुंबईचे कायदे व मुंबई उच्च न्यायालय (हद्दी जाहीर करणे) (सुधारणा) अधिनियम, १९५०

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| उद्देशिका | |
| कलमे | |
| १. संक्षिप्त नाव व प्रारंभ .. .. .. .. | १ |
| २. ते ६. (सन १९४५ चा मुंबई अधिनियम १७ यामध्ये अंतर्भूत) .. .. | १ |
| ७. अनिर्णीत कामकाज .. .. .. .. | १ |
| ८. ते ११. (सन १९४५ चा मुंबई अधिनियम १७ यामध्ये अंतर्भूत) .. .. | २ |


एच ४४५० (३००—११-८५)

# सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ८[1]

## बृहन्मुंबईचे कायदे व मुंबई उच्च न्यायालय (हद्दी जाहीर करणे) (सुधारणा) अधिनियम, १९५०

(३ एप्रिल १९५०)

बृहन्मुंबईचे कायदे व मुंबई उच्च न्यायालय (हद्दी जाहीर करणे) अधिनियम, १९४५ सुधारण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, मुंबई शहराचे नगरपालिका शासन चालविण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेल्या मुंबई शहराच्या महानगरपालिकेच्या आणि इतर पालिका प्राधिकरणांच्या अधिकाराधीन प्रदेशाच्या हद्दी बृहन्मुंबईपर्यंत वाढविण्याचे उपाय योजण्यात येत आहेत ;

आणि ज्याअर्थी, बृहन्मुंबईत विवक्षित प्रदेश समाविष्ट करण्यासाठी बृहन्मुंबईच्या हद्दी वाढविणे इष्ट आहे ;

आणि ज्याअर्थी, बृहन्मुंबईचे कायदे व मुंबई उच्च न्यायालय (हद्दी जाहीर करणे) अधिनियम, १९४५ या प्रयोजनासाठी सुधारणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास बृहन्मुंबईचे कायदे व मुंबई न्यायालय (हद्दी जाहीर करणे) (सुधारणा) अधिनियम, १९५०, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो राज्य शासन शासकीय राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून या बाबतीत नेमील अशा तारखेस अंमलात येईल.

२. ते ६. [कलमे २ ते ६ याद्वारे केलेल्या सुधारणा, बृहन्मुंबई कायदे आणि मुंबई उच्च न्यायालय (हद्दी जाहीर करणे) अधिनियम, १९४५ (१९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७) यामध्ये अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.]

१९५० चा मुंबई ७. ७. या अधिनियमाच्या यापूर्वीच्या तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही प्रलंबित कामकाज, आणि बृहन्मुंबईत उक्त अधिनियमाच्या अनुसूची 'अ' च्या भाग तीनमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले प्रदेश समाविष्ट करण्यात आलेले असले तरीही, मात मुंबईचा नगरपालिका हद्दी वाढविण्याबाबत अधिनियम, १९५० याच्या तरतुदींद्वारे स्पष्टपणे तरतूद करण्यात आलेली असेल ते खेरीज करून—

(१) हा अधिनियम अंमलात येण्याच्या तारखेच्या लगतपूर्वी कोणत्याही दिवाणी अथवा फौजदारी न्यायालयात, किंवा कोणतेही न्यायाधिकरण, सार्वजनिक प्राधिकरण अथवा अधिकारी यांच्यापुढे चालू असलेली सर्व कामे, जणू हा अधिनियम अंमलात आलेला नाही असे समजून, त्या न्यायालयात अथवा त्या न्यायाधिकरणाच्या, सार्वजनिक प्राधिकरणाच्या अथवा अधिकाऱ्याच्या समोर चालू राहतील आणि अशा न्यायालयात न्यायाधिकरणास, प्राधिकरणास अथवा अधिकाऱ्यास उक्त कामकाजांच्या प्रयोजनासाठी, हा अधिनियम, अंमलात येण्याच्या तारखेच्या लगतपूर्वी त्यास जी अधिकारिता व अधिकार असतील त्या सर्व अधिकारिता व अधिकार असतील.

---

[1] उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी **मुंबई शासन राजपत्र**, १९५० भाग पाच, पृष्ठे ४९–५० पहा.

(२) कोणत्याही न्यायालयात अथवा कोणत्याही न्यायाधिकरणासमोर, प्राधिकरणापुढे अथवा अधिकाऱ्यापुढे अशा तऱ्हेने चालू असलेल्या कोणत्याही कामाच्या संबंधात पुनरीक्षणासाठी करावयाचे अपील अथवा अर्ज, यथास्थिती अपिलासंबंधी अथवा पुनरीक्षणासंबंधी अधिकारिता असलेल्या न्यायालयाकडे, न्यायाधिकरणाकडे, प्राधिकरणाकडे किंवा अधिकाऱ्यांकडे करण्यात आला पाहिजे आणि त्या न्यायालयास, न्यायाधिकरणास, प्राधिकरणास अथवा अधिकाऱ्यास, जणू हा अधिनियम अंमलात येण्याच्या तारखेपूर्वी ती कामे त्या न्यायालयात अथवा त्या न्यायाधिकरणाच्या, प्राधिकरणाच्या किंवा अधिकाऱ्याच्या पुढे चालू होती असे समजून उक्त अपील व अर्ज दाखल करून घेता येतील व ते निकालात काढता येईल ;

(३) कोणत्याही न्यायालयाने, न्यायाधिकरणाने, प्राधिकरणाने अथवा अधिकाऱ्याने हा अधिनियम अंमलात आल्याच्या तारखेच्या लगतपूर्वी केलेल्या कोणत्याही हुकूमनाम्याच्या अथवा आदेशाच्या अंमलबजावणीसाठी, करावयाचे सर्व अर्ज आणि अशा हुकूमनाम्यातून अथवा अशा आदेशातून उद्‌भवणारे इतर सर्व अर्ज जणू, हा अधिनियम पारित झालेला नाही असे समजून अशा न्यायालयाकडे, न्यायाधिकरणाकडे, प्राधिकरणाकडे अथवा अधिकाऱ्याकडे करण्यात आले पाहिजेत व त्याच्याकडून ते निकालात काढले गेले पाहिजेत. परंतु या अधिनियमामुळे असे कोणतेही न्यायालय प्राधिकरण अथवा अधिकारी जर काढून टाकण्यात आला असेल अथवा तो तसा असण्याचे बंद झाला असेल तर, असे काम अथवा कोणतेही अपील अथवा पुनरीक्षणासाठी केलेला अर्ज अथवा अशा कामातील इतर कोणतेही अर्ज, राज्य शासन फर्मावील अशा अधिकाऱ्याकडे करण्यात आले पाहिजेत व त्याच्यांकडून ते निकालात काढले गेले पाहिजेत.

**८. ते ११.** [कलमे ८ ते ११ यांद्वारे केलेल्या सुधारणा, बृहन्मुंबई कायदे आणि मुंबई उच्च न्यायालय (हद्दी जाहीर करणे) अधिनियम, १९४५ (१९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७) यामध्ये अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.]

(यथार्थ अनुवाद)

**न. ब. पाटील,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई